**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर**

**विकास शाखा**

**ई-निविदा सुचना**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व पर्यवेक्षण करण्यासाठी"ग्रामीण गृहनिर्माण अभियंता" हे मनुष्यबळ बाहय यंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घेण्यासाठी ई-निविदा माबविण्यात येत आहेत. निविदा सुचना व परिशिष्टये संकेतस्थळ www.mahatenders.gov.in आणि http://zplatur.gov.in/ (जिल्हयाचे संकेतस्थळ ) वर दिनांक 26 / 10 /2018 पासून दिनांक 05/11/2018 रोजी 17.00 वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.ऑनलाईन निविदा www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिनांक 05/11/2018 रोजी 17.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील सदरच्या निविदा दिनांक 12/11/2018 रोजी 14.00 वाजेपर्यंत निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| **लेखाधिकारी वर्ग-२**<br>**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**<br>**लातूर** | **प्रकल्प संचालक,**<br>**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**<br>**लातूर** | **मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. तथा**<br>**अध्यक्ष कार्यकारी समिती,**<br>**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर** |

**<u>विस्तृत जाहिरात</u>**

कार्यालय :– जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर .

पत्ता:– जिल्हा परिषद,परिसर, लातूर, महाराष्ट्र, पिन-413512.

दुरध्वनी क्रमांक :– 02382-243524 आणि 254460

कार्यालयाचे संकेतस्थळ:– http://zplatur.gov.in/

---

**<u>पाहिजेत</u>**

**<u>बाहय यंत्रणेव्दारे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याबाबत</u>**

केंद्र शासनाने सन 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे हे धोरण जाहिर केले आहे. महाराष्ट्र शासनाने सर्वांसाठी घरे 2020 हा कार्यक्रम त्याहीपेक्षा कमी कालावधीत राबविण्याचे नियोजन केले आहे. या धोरणांतर्गत देशातील ग्रामीण भागांमध्ये 4 कोटी घरे बांधावयाची आहेत राज्यातील ग्रामीण भागामध्ये अनुसूचित जाती/ जमाती मधील बेघर घटक, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक यांचेसाठी विविध विभागांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजना जिल्हा परिषद/ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे मार्फत राबविण्यात येत आहेत. सदर ग्रामीण घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बाहय यंत्रणेव्दारे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता हे मनुष्यबळ लातूर जिल्हयात 10 तालूक्यासाठी खालील प्रमाणे उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची अंदाजे संख्या |
|---|---|---|
| 1 | लातूर | 35 |
| | एकुण | 35 |

त्यासाठी मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहय यंत्रणाकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सुचना व परिशिष्टये संकेतस्थळ www.mahatenders.gov.in आणि http://zplatur.gov.in/ (जिल्हयाचे संकेतस्थळ ) वर दिनांक 26 /10/2018 पासून दिनांक 05/11/2018 रोजी 17.00 वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. आनलाईन निविदा www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिनांक 05/11/2018 रोजी 17.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील सदरच्या निविदा दिनांक 12/11/2018 रोजी सकाळी/दुपारी 14.00 वा. निविदाकार अथवा तयांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

एका संस्थेस एका विभागात जास्तीत जास्त दोन जिल्हयात काम करता येईल. मात्र संबंधित विभागात पुरवित असलेल्या मनुष्यबळाबाबत घोषणापत्र द्यावे लागेल. मात्र सस्थेस कितीही जिल्हयासाठी निविदा सादर करता येईल. अशी निविदा सादर करतांना काम करावयाच्या जिल्हयांचा प्राधान्यक्रम नमुद करावा कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**<u>ग्रामीण गृहनिर्माण अभियंता करीता शैक्षणिक अर्हता, कर्तव्य व जबाबदा-या : –</u>**

1. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची शैक्षणिक पात्रता स्थापत्य अभियांत्रिकीमधील किमान पदविकाधारक अशी राहील.

   ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे कर्तव्य व जबाबदा-या या संबंधित जिल्हयांचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे निश्चित करतील. असे करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, योजनेचे मार्गदर्शक तत्वे यांचा भंग होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**3.संस्थेची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरावर समितीची स्थापना करण्यात आलेली असून ती खालील प्रमाणे असेल-**

| | | |
|---|---|---|
| 1 | मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर | अध्यक्ष |
| 2 | कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, (सबंधित) | सदस्य |
| 3 | प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सबंधित) | सदस्य सचिव |

**ग्रामीण गृहनिर्माण अभियंता या मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाह्य यंत्रणांची निवड –**

ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना राज्य शासनाने घोषीत केलेल्या डोंगराळ व दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील एक घरकुल पूर्ण करणेसाठी रु. 1000/- व सलग भुप्रदेश व इतर भागातील घरकुल पूर्ण करणेसाठी – 750/- याप्रमाणे बाह्य यंत्रणेने टप्पा निहाय मानधन उपब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाह्य यंत्रणांची निवड करताना विचारात घ्यावयाचे गुणांकन**.

| अ.क्र. | विवरण | गुणसंख्या | अभिप्राय/विश्लेषण |
|---|---|---|---|
| 1 | या स्वरुपाचे मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव | 40 | संस्थेच्या अशा प्रकारच्या कामाच्या अनुभवाप्रमाणे (मनुष्यबळ संख्या व सेवा पुरवल्याचे वर्ष नमुद असणे आवश्यक) |
| 2 | मागील पाच वर्षाचे लेखा परिक्षित ताळेबंद | 10 | मागील 3 वर्षामध्ये बाहय यंत्रणेने सरासरी किती मनुष्यबळ उपलब्ध करुन दिलेल्या आहेत त्यानुसार खर्चिक गुण वाढेल प्रतीवर्ष 2 गुण या प्रमाणे |
| 3 | बाह्य यंत्रणेचे मुख्यालय विभागांतर्गत असल्यास | 10 | शासकीय यंत्रणेसोबत काम करण्याचा अनुभव असल्यास 10 गुण |
| 4 | बाह्य यंत्रणेचे मुख्यालय विभागांतर्गत ते ज्या जिल्हयात काम करणार आहेत तो जिल्हा असल्यास | 10 | -- |
| 5 | बाह्य यंत्रणेची वित्तीय क्षमता | 15 | तांत्रिक मनुष्यबळ (अभियंते)पुरवण्याचा अनुभव असल्यास 10 गुण मात्र, त्यांनी निविदा प्रक्रीयेमध्ये सहभागी होणे अनिवार्य आहे. |
| 6 | बाह्य यंत्रणा शासकीय | 15 | |
| | एकूण | 100 | |

अ.क्र. 1 वरील मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव 40 गुणसंख्येचे विश्लेषण

1. मनुष्यबळ पुरवठा करण्याचा पुर्वानुभव - एकुण 10 गुण

| अ.क्र. | वर्ष | गुण |
|---|---|---|
| 1 | 1 ते 3 वर्ष | 2.5 |
| 2 | 3 ते 5 वर्ष | 5 |
| 3 | 5 ते 7 वर्ष | 7.5 |
| 4 | 7 पेक्षा जास्त वर्ष | 10 |

2. मागील तीन वर्षामध्ये बाह्य यंत्रणेने सरासरी किती मनुष्यबळ उपलब्ध करुन दिलेले आहे. या बाबत खालील पध्दतीने गुण द्यावेत - एकूण गुण 15

   अ) दरवर्षी सरासरी 1 ते 25 मनुष्यबळ पुरवठा केले असल्यास = 5 गुण

   ब) 26 ते 50 मनुष्यबळ पुरवठा केले असल्यास = 10 गुण

   क) 51 पेक्षा जास्त मनुष्यबळ पुरवठा केले असल्यास = 15 गुण

3. बाह्य यंत्रणेस एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी 10 पेक्षा जास्त तांत्रीक मनुष्यबळ (अभियंते) पुरविण्याचा अनुभव असल्यास = 10 गुण

4. बाह्य यंत्रणेस यापूर्वी शासकीय यंत्रणेसोबत काम करण्याचा अनुभव असल्यास = 05 गुण

अ.क्र. 5 वरील बाह्य यंत्रणेची वित्तीय क्षमता 15 गुणांचे विश्लेषण खालील प्रमाणे करावे.

मागील 3 वर्षाची सरासरी उलाढाल तपासून खालील प्रमाणे गुण द्यावेत.

| अ.क्र. | वर्ष | गुण |
|---|---|---|
| 1 | 1 ते 10 लाख | 5 |
| 2 | 5 ते 20 लाख | 10 |
| 3 | 30 लाखापेक्षा जास्त | 15 |

**देय मानधन**-

ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना राज्य शासनाने घोषीत केलेल्या शासन निर्णय क्रमांक:पीएमएवाय-जी-2018 /प्र.क्र.245/योजना-10 दिनांक 25 सप्टेंबर, 2018 नूसार डोंगराळ व दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील एक घरकुल पूर्ण करणेसाठी रु. 1000/- व सलग भुप्रदेश व इतर भागातील घरकुल पूर्ण करणेसाठी – 750/- याप्रमाणे बाह्य यंत्रणेने टप्पा निहाय मानधन उपब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा टप्पा | डोंगराळ व दुर्गम भाग | इतर भाग |
|---|---|---|---|
| 1 | जोत्यापर्यंत पूर्ण | रु.250/- | रु. 200/- |
| 2 | छज्जा (Lintel) पातळीपर्यंत काम पूर्ण करणे | रु.250/- | रु. 200/- |
| 3 | छतपातळीपर्यंत काम पूर्ण करणे | रु.250/- | रु. 200/- |
| 4 | शौचालयासह काम पूर्ण करणे व अंतिम दाखला देणे. | रु.250/- | रु. 150/- |
| | एकुण | रु.1000/- | रु. 750/- |

पूढील प्रमाणे नमुद केल्यानुसार परिस्थिती असल्यास सुधारीत दराने मानधन अनुज्ञेय करण्यात येत आहे.

ज्या गावांमध्ये 5 पेक्षा कमी घरकुले मंजुर आहेत किंवा सुरुवातीला जरी मंजुर घरकुलांची संख्या जास्त असेल तरी सद्यस्थितीत 5 पेक्षा कमी घरकुले किंवा एकूण प्रगती पथावरील घरकुलांचे रुपांतरीत स्वरुपातील 20 पेक्षा कमी टप्प्याचे काम शिल्लक आहेत, अशा गावातील प्रती घरकुलासाठी / उर्वरीत टप्प्याच्या कामासाठी पुढील प्रमाणे विवरणपत्रात नमुद केल्यानुसार सुधारित मानधन अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा टप्पा | डोंगराळ व दुर्गम भाग | इतर भाग |
|---|---|---|---|
| 1 | जोत्यापर्यंत पूर्ण | रु.300/- | रु. 250/- |
| 2 | छज्जा (Lintel) पातळीपर्यंत काम पूर्ण करणे | रु.300/- | रु. 250/- |
| 3 | छतपातळीपर्यंत काम पूर्ण करणे | रु.300/- | रु. 250/- |
| 4 | शौचालयासह काम पूर्ण करणे व अंतिम दाखला देणे. | रु.300/- | रु. 250/- |
| | एकुण | रु.1200/- | रु. 1000/- |

एका गावात सुरुवातीला 5 पेक्षा जास्त घरकुले असल्यास जोपर्यंत प्रगतीपथावरील घरकुले 5 पेक्षा कमी होत नाही तोपर्यंत रु.750/- (सर्वसाधारण क्षेत्र) व रु.1000/- (डोंगराळ क्षेत्र) एवढे मानधन अनुज्ञेय असून त्यानंतर वरीलप्रमाणे सुधारील मानधन राहिल.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याच्या वरीलप्रमाणे देय मानधनात तालुका अंतर्गत प्रवास व दैकनक भत्याचा अंतर्भाव आहे. तालुक्याबाहेरील शासकीय कामाच्या प्रवासासाठी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता कार्यालयीन अधीक्षक या पदास देय असणा-या तरतूदीप्रमाणे देण्यात येतील सदरील रक्कम उपलब्ध प्रशासकीय रक्कमेतून देण्यात येईल बाह्य संस्थेस मनुष्यबळाचे देय मानधन तसेच देय मानधनाच्या 10 टक्के सेवा शुल्क व या सर्व रक्कमेवर देय कर सेवा शुल्क म्हणून देण्यात येईल.

**व्यवस्थेचा कालावधी –**

सदरील व्यवस्थेचा कालावधी मार्च-2020 पर्यंत किंवा शासनाच्या पुढील सुचनेपर्यंत मर्यादित राहील. बाह्य यंत्रणेचे मनुष्यबळ समाधानकारक नसल्यास, सेवा समाधानकारक नसल्यास प्रकल्प संचालक याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,यांना सविस्तर कळवून आणि त्यांच्या मंजूरीने बाहय यंत्रणेचे काम संपुष्टात आणण्याबाबत कार्यवाही करतील.

बाह्य यंत्रणेस पुरवठा / सेवा संपुष्टात आणावयाची असल्यास किमान एक महिना अगोदर मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित प्रकल्प संचालक यांना लेखी स्वरुपात कळविण्यात यावे.

अशावेळी गुणानुक्रमे पुढील क्रमाने पात्र संस्थेची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी करतील, पुन्हा निविदा मागविण्याची आवश्यकता नाही.

निविदा शुल्क रु. 1,000/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र ) ना- परतावा,

इसारा रक्कम (EMD)रु. 10,000/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र )

निविदा धारकांनी निविदा शुल्क व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नेट बॅकींग प्रणालीतून भरावे बाह्य यंत्रणांनी खालील कागदपत्रे साक्षांकित करुन ऑनलाईन सादर करावीत.

1. निविदा शुल्क भरल्याचा पुरावा.
2. अनामत रक्कम भरल्याचा पुरावा.
3. जाहिरातीत नमुद केलेले मनुष्यबळ पुरविण्याच्या अनुभवाची कागदपत्रे .
4. मागील पाच वर्षांचे लेखा परिक्षित ताळेबंद.
5. बाह्य यंत्रणेचे मुख्यालयाचे ठिकाण दर्शविणारा पुरावा.
6. बाह्य यंत्रणेची वित्तीय क्षमता दर्शविणारा पुरावा.
7. मनुष्यबळ उपलब्धते बाबत तपशिल आणि विवरणपत्र.
8. संस्थेच्या नोंदणी बाबतची कागदपत्रे.
9. मागील तीन वर्षाच्या आयकर विवरणपत्राच्या प्रती.
10. सेवा कर नियमितपणे भरल्याबाबतची कागदपत्रे.
11. पॅन/टॅन कार्डाची प्रत.
12. GST नोंदणी प्रमाणपत्र / GST रिटर्न.
13. VAT रिटर्न 31.03.2017.
14. VAT क्लीयरन्स प्रमाणपत्र.31.03.2017 अखेर.
15. बँक पासबुक प्रथम पान व व्यवहाराचे शेवटच्या पानाची प्रत.

**इतर बाबी :-**

ग्रामीण बृहनिर्माण अभियंता या मनुष्यबळ संबंधित जिल्ह्याच्या तालुक्यातील पंचायत समिती येथे काम करावे लागेल. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना मानधन, भत्ता रक्कम अथवा कोणताही निधी थेट

दिला जाणार नाही. कोणत्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार हा थेट संस्थेशी करण्यात येईल. संस्थेनी दरमहा देयकाची मागणी संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडे करावी. प्रकल्प संचालक देय मानधनाबाबत संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडून खात्री पटवून पाक्षिकाच्या आत देयकाची अदायगी गट विकास अधिकारी मार्फत करतील.

**<u>गृहनिर्माण अभियंता यांची कर्तव्ये व जबाबदा-या</u>**

1. ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गतच्या सर्व योजनासाठी तांत्रिक मार्गदर्शन, लाभार्थीना बांधकाम साहित्याची उपलब्धता, मजूर उपलब्धता याबाबत मार्गदर्शन करुन कामाचे रेखांकन करणे, घरकुलाचा नकाशा याबाबत चर्चा करुन मार्गदर्शन करणे.
2. स्थानिक संसाधनाचा वापर करुन घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी, पर्यावरण पुरक, किफायती तंत्रज्ञानाचा वापर याबाबत लाभधारकांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.
3. गवंडी प्रशिक्षणामध्ये सक्रीय सहभाग नोदवून प्रशिक्षण प्रभावी व विहित कालावधीत पुर्ण करणे.
4. मगांराग्रारोहयो अंतर्गत घरकुल लाभार्थीना देय असलेले 90/95 दिवसाचे अकुशल मनुष्य दिनाचे काम व मजूर मिळविण्यासाठी संनियंत्रण करणे. मात्र "प्रधानमंत्री आवास योजना –ग्रामीण"घरकुलाची टप्पानिहाय नोंद महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत असलेल्या तांत्रिक अधिकारी मोजमाप पुस्तीकेत नोंदवील.
5. स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकामाचे संनियंत्रण करणे, सोकपीट, कंपोस्ट पीट ही कामे पुर्ण करुन घेणे तसेच घरकुल भूकंपरोधक, अग्नीरोधक बांधण्यासाठी तांत्रिक सहाय्य करणे.
6. कामाची अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणेबाबत योनेच्या संकेतस्थळावर माहिती सादर करण्याच्यर अनुषगाने कायर्वाही करणे, कामाची सर्व पातळीवरील छायाचित्रे मोबाईल ॲप वापरुन काढणे व डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या मदतीने योजनेच्या संकेतस्थळावर सादर करणे.
7. काम पुर्ण झाल्यानंतर कामाचे पुर्णत्वाचे दाखले सक्षम अधिका-याकडुन घेऊन योजनेच्या संकेतस्थळावर सादर करणे. सामाजिक अंकेक्षणासाठी अभिलेख सादर करुन सामाजिक अंकेक्षण करुन घेणे.
8. घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या पंतप्रधान आवास योजना- ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, राजीव गांधी निवारा योजना क्र. 1 व तत्सम इतर ग्रामीण घरकुल योजनेतील पात्र भूमीहीन बेघर कुटुबांना पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य देण्यासाठी तालुका स्तरीय समितीत तांत्रिक बाबी विषयी सहकार्य करणे.
9. लाभार्थीना घरकुल बांधकामासाठी आवश्यकता भासल्यास बँक / वित्तीय संस्था यांचेद्वारे अर्थसहाय उपलब्ध करुन देणेसाठी मदत / सहकार्य करणे.
10. गृहनिर्माण कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण,चर्चा सत्र, कार्यशाळा, लाभधारकांचे मेळावे आयोजीत करणे तसेच योजनेच्या प्रसिध्दि याबाबत कार्यवाही करणे.
11. गृहनिर्माण योजनेबाबतचे Reporting, Monitoring , तांत्रीक मार्गदर्शन करणे.
12. ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गतच्या सर्व योजनांचे अहवाल तयार करणे, मागविणे,एकत्रितपणे पंचायत समिती/ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा/जिल्हा परिषद यांचेकडे आवश्यकतेप्रमाणे Online व Offline पाठविणे.

**अटी व शर्ती :-**

1. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता हे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावयाचे असून सदरील मनुष्यबळ किमान स्थापत्य अभियांत्रीकी मधील पदवीकाधारक असणे आवश्यक आहे. उच्च विद्याविभुषीत मनुष्यबळास प्राधान्य द्यावे. ( मनुष्यबळ पुरवितांना तालुका निहाय संख्या व मनुष्यबळाचे नांव याबाबत करार करावा लागेल.)
2. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात येणा-या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबतची खात्री पटविण्यासाठी त्यांच्या अभियांत्रिकी पदवीका / पदवी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करावी लागेल.
3. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देणेत येणारे ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, बाह्ययंत्रणेद्वारे ज्या जिल्ह्यासाठी सेवा पुरविण्यात येणार आहेत शक्यतो त्याच जिल्ह्यातील असावेत. अनिवार्य परिस्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने संलग्न जिल्ह्यातील गृहनिर्माण अभियंते उपलब्ध करुन देणे अनुज्ञेय राहील.
4. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात येणारे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता हे ग्रामीण विकास विभागामार्फत कार्यान्वीत करण्यात येणा-या मागास क्षेत्रविकास कार्यक्रम,प्रधानमंत्री ग्राम सडक योजना,राजीव गांधी पंचायत सक्षमीकरण अभियान आणि यासारख्या बांधकाम विषयक योजनेत अथवा जिल्हा परिषद/पंचायत समितीमधील बांधकाम विभागामध्ये कामाचा अनुभव असणा-या शैक्षणिक पात्रताधारक उमेदवार उपलब्ध नसल्यास इतर पात्र अभियंता उपलब्ध करुन द्यावेत.
5. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याचे नांव, भ्रमणध्वनी क्रमांक व पत्ता या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.
6. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन दिलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंतायांना संबंधीत गट विकास अधिकारी कार्यक्षेत्राचे वाटप करतील. सदर मनुष्यबळाने आदेश दिल्यानंतर सात दिवसाचे आत संबंधित पंचायत समिती कार्यालयास हजर व्हावे लागेल.
7. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी पुरविलेल्या बाह्यस्थ मनुष्यबळास राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,नवी मुंबई यांनी कळविलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांच्या कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडणे अनिवार्य आहे. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.
8. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन दिलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी कोणत्याही प्रकारच्या चुकीची देयक अदायगी, दुबार अथवा अस्तित्वात नसलेल्या घरांना निधी वितरण आथवा इतर कोणत्याही क्षेत्रीय अनियमिततेची जबाबदारी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची राहील. पर्यायाने अशा रक्कमेची एकरकमी वसूली संस्थेकडून करण्यात येईल.
9. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन दिलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता बाबत तक्रार, कामातील अनियमीतता यामुळे ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची सेवा संपुष्टात आणूण पर्यायी मनुष्यबळ संस्थेने तत्काळ देणे बंधनकारक आहे. मनुष्यबळाने स्वत:हून राजीनामा देणे, कामावर येण्यास नकार देणे, अशा परिस्थीतीत बाह्यस्थ संस्थेने तत्काळ पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
10. तालूका स्तरावरील गट विकास अधिकारी आणि पंचायत समिती मधील उप अभियंता हे पुरविलेल्या मनुष्यबळास गरजेनुसार तसेच वारंवार कामाबाबत मार्गदर्शन करतील. ग्रामीण गृहनिर्माण अभियंताहे गट विकास अधिकारी यांचेकडे आपल्या दैनंदीन कामकाजाबाबत, दौ-याबाबतचा अहवाल सादर करतील.

11. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचेबाबत वारंवार तक्रारी, असमाधानकारक प्रगती असे दिसून आल्यास प्रकल्प संचालक अशा मनुष्यबळा ऐवजी पर्यायी मनुष्यबळ बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेतील. बाह्ययंत्रणेस याबाबत कार्यवाही करुन पर्यायी मनुष्यबळ तत्काळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
12. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना कामाच्या अनुषंगाने देय मानधन बाह्ययंत्रणाद्वारे देय राहील. मानधन देणे, उशिरा देणे यासारख्या बाबी विषयी प्रकल्प संचालक जबाबदार राहणार नाहीत.
13. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना कामाच्या प्रमाणात देयकांची अदायगी करण्यात येईल. सदरील देयक एकत्रित देण्यात येईल. प्रत्येक पूर्ण घरकूल कामासाठी-डोंगराळ व दुर्गम भाग रु.1000/- व इतर भाग रु.750/- याप्रमाणे मानधन देय असून हे मानधन घरकूल बांधकामाच्या टप्पा प्रमाणे देयक राहील.
14. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना कामाच्या अनुषंगाने तालुक्या अंतर्गत करावयाचे दौरे, प्रवास यासाठी वेगळयाने भत्ता, प्रवास भत्ता, दिला जाणार नाही. तसेच तालूक्याच्या ठिकाणी आयोजीत बैठकीसाठी देखील असे भत्ते दिले जाणार नाहीत. तालुक्या अंतर्गत / तालुकास्तरावर प्रवास हा त्याचा कार्याचाच भाग राहील.
15. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना घरकुल कामाच्या अनुषंगाने तालुक्याबाहेर सभा,प्रशिक्षण इ.कामासाठी प्रवास करावा लागल्यास त्यासाठी प्रवास भत्ता कार्यालयीन अधिक्षक पदास देय असणा-या तरतूदीप्रमाणे देण्यात येतील.
16. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना डोंगराळ व दुर्गम भागात-20 व इतर भागात-250 घरकुलांची कामे करणे अपेक्षीत आहे. मात्र स्थानिक पातळीवरील प्रश्न, मनुष्यबळ, यासारख्या बाबी विचारात घेता 10 टक्के कमी अधिक घरकुल संख्या करता येऊ शकेल.
17. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना झालेल्या कामानुसार बाह्य संस्थेने संपुर्ण मानधन देणे अनिवार्य आहे. संस्थेस असे मनुष्यबळ परविल्याबद्दल Service Charge देण्यात येत आहे. पंचायत समिती/जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे मनुष्यबळास दिलेल्या मानधनाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारच्या कमी अदायगी,चुकीची अदायगीबाबत जबाबदार रहाणार नाही.
18. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या सेवा पुरवितांना कामगार कायद्ययातील अनुषंगिक सर्व बाबींची पूर्तता करावयाची असून त्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या दायीत्वाची जाबाबदारी बाह्ययंत्रणेची राहील.
19. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी दरमहा झालेल्या कामाच्या अनुषंगाने देयकाची मागणी गट विकास अधिकारी यांच्याकडे 10 तारखेच्या आत विहित नमुन्यात करावी. सदरील मानधनाबाबत गट विकास अधिकारी यांनी 20 तारखेपर्यंत खात्री करुन प्रमाणीत करुन 25 तारखेपर्यंत प्रमाणीत मागणीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी अदा करतील. मागणीकरता ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधनाची रक्कम+10 टकके सेवाकर+देयकर याची एकत्रित बेरीज करुन मागणी करावी.
20. निवड झालेल्या बाह्ययंत्रणेस/ संस्थेला देयकाची रक्कम धनादेश/धनाकर्ष/RTGS द्वारे देण्यात येईल.
21. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांनी परिपूर्ण देयक सादर केल्यानंतर एक महिन्याचोत देयकाची अदायगी करण्यात येईल.

22. निवड झालेल्या बाह्ययंत्रणेने/संस्थेने PAN No.इत्यादी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि गट विकास अधिकारी उपलब्ध करुन द्यावेत. जेणे करुन कराची कपात करणे व इतर अनुषंगीक बाबी सुकर होतील. संस्थेस देय रकमेतून TDS ची कपात नियमानुसार करण्यात येईल.
23. निवड झालेल्या बाह्ययंत्रणा यांना पंचायत समिती,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे देयकाची गणना व मागणी करण्यासाठी विहित नमुना उपलब्ध करुन देतील. जिल्ह्यातील सर्व तालुक्यात सुसुत्रता असावी, या अनुषंगाने एकच नमुना वापरावा.
24. बाह्ययंत्रणेची निवड मार्च 2020 पर्यंत किंवा शासनाच्या सुचना येईपर्यंत राहील. तसेच संस्थेचे काम समाधानकारक आढळून न आल्यास त्यांचे काम संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहे.
25. निविदे संदर्भातील अटी व शर्ती शिथील करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर यांनी राखून ठेवले आहे.
26. सदरील निविदे बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास तो जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर कार्यालयाच्या जिल्हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील.

मी/आम्ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांच्यामार्फत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण गृहनिर्माण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण अभियंते बाह्ययंत्रणेकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत निविदेतील अटी व शर्ती संपुर्णपेणे वाचलेल्या आसून समजून घेतलेल्या आहेत. त्या मला/आम्हास मान्य आहेत व बंधनकारक आहेत. निविदाधारकाने भरुन द्यावयाचा तपशील विहित प्रपत्रात आश्यक पुराव्यासह भरुन दिलेला आहे.

दिनांक

Sd/-

**मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. तथा**
**अध्यक्ष कार्यकारी समिती,**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर**

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर गृहनिर्माण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बाह्य यंत्रणेकडून ग्रामीण गृहनिर्माण अभियंते उपलब्ध करुन घेण्यासाठी बाह्य यंत्रणा/ निविदा धारकाने भरुन द्यावयाचा तपशील

1. निविदा धारकाचे नाव :- ---------------------------------------------------------
2. संस्थेचा नोंदणी क्रमांक (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी ) :---------------------------------------------------------
3. संस्थेच्या मुख्यालयाचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक :---------------------------------------------------------
   ---------------------------------------------------------
   ---------------------------------------------------------
4. निविदा शुल्क भरले आहे/नाही पुरावा जोडावा :---------------------------------------------------------
5. अनामत रक्कम भरलेली आहे/ नाही पुरावा जोडावा :- ---------------------------------------------------------
6. बँक पासबुक प्रथम पान व व्यवहाराच्या शेवटच्या पानाची जोडावी. :---------------------------------------------------------
7. पॅन/टॅन कार्डाची प्रत जोडावी :---------------------------------------------------------
8. मार्च 2018 पर्यंत व्यवसायकर भरल्याबाबतचा पुरावा जोडावा. :---------------------------------------------------------
9. आतापर्यंत अभियंते पुरविण्याचा :- संस्थेला असलेल्या अनुभवाचा तपशील : (सोबत पुरावा जोडावा )

| वर्ष | अभियंतेपुरविलेल्या यंत्रणेचे नाव व पत्ता | पुरविलेल्याअभियंत्यांची संख्या |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

10. सन 2013-14,14-15,15-16,:- 16-17,17-18 या वर्षाचे व उपलब्ध असल्यास सन 2018-19 चा लेखा परिक्षीत ताळेबंद जोडवा. ---------------------------------------------------------
11. सन 2014-15, 2015-16, 2016-17 :- 2017-18 या वर्षाचे आयकर विवरण पत्राच्या प्रती जोडाव्यात. ---------------------------------------------------------

12. संस्थेकडे किती अभियंते उपलब्ध :- स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधारक -----------------------------
आहेत त्याचा तपशील स्थापत्य अभियांत्रिकी पदवीकाधारक -------------------------

13. संस्था लातूर जिल्ह्यासाठी अभियंते:- ---------------------------------------------------------
पुरविण्यास तयार आहे किंवा नाही. ---------------------------------------------------------

निविदा धारकाची स्वाक्षरी

नाव --------------------------------